RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक १९] मंगळवार, जुलै ७, २०२६/आषाढ १६, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ३६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.**—महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. .. .. .. .. | **पृष्ठे** १–२ |


दिनांक ३ जुलै, २०२६ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सुप्रिया धावरे,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.**

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

२०१७ चा महा. ४३.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने, अंमलात येईल आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नेमून देण्यात येतील.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १५ मध्ये, पोट-कलम (३) मधील, खंड (ख) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— २०१७ चा महा. ४३.

"(ख) पुरवठा करण्यात आल्यानंतर, अशा सवलतीसाठी, पुरवठादाराकडून जमापत्र काढण्यात आले असेल आणि कलम ३४ च्या तरतुदींनुसार, पुरवठ्याच्या प्राप्तकर्त्याने अशा सवलती इतकी निविष्टी कराची जमा रक्कम परत केलेली असेल तर.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "दोन्हींची जेथे कमतरता आढळून येते" या मजकुरानंतर, "किंवा जेथे कलम १५ च्या पोट-कलम (३) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेली सवलत दिलेली असेल" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५४ मध्ये,-

(क) पोट-कलम (६) मधील, "वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या शून्याधारित पुरवठ्यामुळे" या मजकुरानंतर, "किंवा पोट-कलम (३) च्या पहिल्या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये न वापरलेल्या निविष्टी कराच्या जमा रकमेच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (१४) मधील, "पोट-कलम (५) किंवा पोट-कलम (६) अन्वये" या मजकुरानंतर, "ज्या प्रकरणांमध्ये भारताबाहेर निर्यात केलेल्या वस्तूंवर कर प्रदान करून कर परताव्याचा दावा केला असेल त्या प्रकरणांव्यतिरिक्त" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.